Details on Website

जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतननिश्चितीची पडताळणी करण्यासाठी मंत्रालयीन संवर्गाच्या वेतननिश्चितीचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त लेखा अधिकाऱ्याची (गट ब - राजपत्रित) करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

**विभागाची आवश्यकता :**

७ व्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीचे काम प्राथम्याने व अचूकपणे करणे आवश्यक आहे. त्यासाठी वेतननिश्चितीचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त लेखा अधिकाऱ्याची (गट ब - राजपत्रित) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती केवळ १ वर्षाकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) वेतन पडताळणी पथकात काम केल्याचा ५ वर्षाचा अनुभव असावा.

३) मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन आयोग, आश्वासित प्रगती योजना, पदोन्नती इ. च्या अनुषंगाने वेतननिश्चितीचा अनुभव असावा.

४) मागील २ वर्षात सेवानिवृत्त झालेला, मुंबई/मुंबई उपनगर स्थित अधिकारी असावा.

५) आयकर गणनेबाबत माहिती असणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

६) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज विहित नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलेखित करावा.

७) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसापर्यंत " अवर सचिव (गृव्य), ३ रा मजला, मेन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ " या पत्त्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीश: आणून द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२७९४१४६/ २२८२१७५१ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ येथे काम करावे लागेल.

११) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी हे उप सचिव (सेवा) यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करतील.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

**************

# अर्जाचा नमुना

७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतननिश्चितीची पडताळणी करण्यासाठी मंत्रालयीन संवर्गाच्या वेतननिश्चितीचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त लेखा अधिकाऱ्याची (गट ब - राजपत्रित) करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-........................................

२) अर्जदाराचा पत्ता :-........................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-........................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-........................................

५) जन्म दिनांक व वय :-........................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? :- होय / नाही

७) अनुभव :-

उपरोक्त विषयांकीत कामासाठी करार पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची स्वाक्षरी

जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई

सेवानिवृत्त अधिकारी यांची करारपध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतननिश्चितीची पडताळणी करण्यासाठी सेवानिवृत्त लेखा अधिकाऱ्याची जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई येथे करार पध्दतीने नेमणुक करावयाची आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१००/१३,दिनांक १७ डिसेंबर,२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ https://wrd.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील सविस्तर माहीती पाहून अर्ज करावेत.

(रा.य.शिंदे)

अवर सचिव,जलसंपदा विभाग

०२२-२२८२१७५१/०२२-२२७९४१४६